पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/९८७/२०१७
दिनांक : २१/०७/२०१७

प्रति,

मा......................................
सदस्य, शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा दिनांक **२५/०७/२०१७** रोजी आयोजित केलेबाबत...

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा मंगळवार दिनांक **२५/०७/२०१७** रोजी दुपारी **३.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

मा.कळावे,

आपला विश्वासू



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.शहर सुधारणा समिती

**कार्यपत्रिका क्रमांक – ८**

दिनांक : **२५/०७/२०१७** वेळ : दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा मंगळवार दिनांक **२५/०७/२०१७** रोजी दुपारी **३.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

---------

दिनांक **११/०७/२०१७** रोजी झालेल्या विशेष सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक ७)** सभावृत्तांत कायम करणे.

----------

विषय क्र.१) मौजे पिंपळे गुरव, पिंपळे सौदागर, मौजे सांगवी पर्यत संरक्षण विभागाच्या हद्दीलगत असलेल्या मंजूर विकास योजनेतील १२ मी./१८ मी. रूंद रस्त्यालगत संरक्षण विभागाच्या हद्दीतून आणखी १२ मी. रूंद रस्ता करणे व या व्यतिरिक्त मौजे सांगवी स.नं. ६८ पासुन (बी.आर.घोलप कॉलेजची उत्तरेकडील बाजू) ते नवी सांगवी बस स्टॉप पर्यत अतिरिक्त २४ मी. रस्ता तसेच यापूर्वीच्या संरक्षण विभागाने मंजूरी दिलेल्या **H to I ($R_3$)** रस्त्याकरीता अतिरिक्त १२ मी. रूंद रस्ता करणे आवश्यक आहे. सदरचा अतिरिक्त रस्ता केल्याने, सदर रस्ता हा दोन बीआरटी रस्त्यांना जोडणार असल्याने वाहतुकीसाठी फीडर रूट म्हणून उपयोगात येणार आहे. तसेच सदर भागाचा विकास मोठ्या प्रमाणावर झालेला असल्याने वाहतुक सुरळीत व सुरक्षित होण्याच्या दृष्टीने सदरचा रस्ता होणे गरजेचे आहे. सदर नियोजित रस्त्यांची लांबी सुमारे **४९३० मी.** इतकी असणार आहे. सदरची जागा सुमारे **६३९६० चौ.मी.** व विकास योजनेतील १२ मी. व १८ मी. रूंद रस्त्यामधील उर्वरित क्षेत्रासह एकुण क्षेत्र संरक्षण विभागाचे असल्याने सदरचे क्षेत्र संरक्षण विभागाकडून मनपास हस्तांतरीत करावे लागणार आहे. त्यासाठी महापालिकेने संरक्षण विभागास सदर जागेचे नियमानुसार मुल्य अदा करावे लागणार आहे. तरी सदरची जागा संरक्षण विभागाकडुन मनपास हस्तांतर करून घेऊन संरक्षण विभागास सदर जागेचे मुल्य अदा करणे व त्यासाठी आवश्यक सर्व्हेक्षण, मोजणी करणे इत्यादी अनुषंगिक मंजुरीसह येणा-या सर्व खर्चाबाबत मा. आयुक्तसो यांना संपुर्ण अधिकार देणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

**नगरसचिव**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय

क्रमांक : नस/४/कावि/९८७/२०१७

दिनांक : २१/०७/२०१७ चे लगत.

टिप - प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयाचे विषयपत्र (डॉकेट) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आले आहे.